# Socio-Political and Economic Security in the Era of Globalisation

(Multilingual)



**Edited By**
**Dr. S. S. Rane**
**Mr. J. D. Lekurwale**

**Published By**
**Lewa Educational Union's**
**Dr. A. G. D. Bendale Mahila Mahavidyalaya,**
**Jalgaon - 425001**
**NACC Re-Accredited 'A' Grade (3.11)**

QUALITY SYSTEM CERTIFICATION
DNV·GL
ISO 9001

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 29 | 'Globalisation and Terrorism' | Dr.B.D.Todkar | 147-153 |
| 30 | "Era of Globalisation inPakistan;focus on China-Pakistan Economic Corridor" | *Subhan Jadhav* | 154-160 |
| 31 | The Threat of Expansion of Maoist Movement in the Era of Globalization | Dr. Devendra G. Vispute | 161-164 |
| 32 | भारताच्या सुरक्षेसमोरील आव्हाने | प्रा.डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव | 165-170 |
| 33 | INDIA'S ROLE AND GEOSTRATEGIC INTEREST IN CENTRAL ASIA | Dr. L. P. Wagh | 171-189 |
| 34 | India's Strategic Culture and India's National Security | Dr. L. P. Wagh | 190-206 |
| 35 | CHANGING DIMENSIONS OF INTERNAL SECURITY THREATS IN INDIA IN THE AGE OF GLOBALISATION | Dr Priya Ranjan Kumar | 207 |
| 36 | "A CHALLENGES TO INDIA'S NATIONAL SECURITY IN THE ERA OF GLOBALIZATION" | Prashant Prabhakar Saraf | 208-212 |
| 37 | SECURITY CHALLENGES IN THE AGE OF GLOBALISATION: TECHNOLOGICAL ADVANCEMENT | Flight Lieutenant Prashant Yadav | 213-217 |
| 38 | Russia in the Middle East | Dr. Swati Pitale<br>Shoaib Khan | 218 |
| 39 | Guangdong Experience and Dongguan Model: Achievements and Chanllenges for China's Urbanization | JIA Haitao: | 219 |
| 40 | "सामाजीक, राजकीय आणि आर्थिक दहशतवाद" | प्राचार्य डॉ. व्हि. एच. नागरे | 220-224 |
| 41 | GLOBALISATION, NON-STATE ACTORS AND INTERNATIONAL SECURITY: A THEORECTICAL PERSPECTIVE | Sachin N. Pardhe | 225 |
| 42 | "तंत्रविद्यात्मक विकासामध्ये जागतिकीकरणाचे योगदान : एक समाजशास्त्रीय अभ्यास" | प्रा.दत्तराव उत्तमराव राठोड<br>प्रा.मधुकर आत्माराम देसल | 226-230 |
| 43 | RESHAPING SECURITY IN SOUTH ASIA :CHANGING FROM REGIONAL TO SUBREGIONAL FRAMEWORK | Ms Neelu khosla | 231 |




Scanned by CamScanner

## भारताच्या सुरक्षेसमोरील आव्हाने

**प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबुराव**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय देगलूर
ता.देगलूर जि.नांदेड.
मो.नं.०९४२३४३९२७६

पठानकोठ येथे झालेल्या दहशतवादी हल्याची जबाबदारी पाक पुरस्कृत दहशतवादी संघटनांनी घेतली. या हल्यात अनेक भारतीय जवान आणि दहशतवादी मारले गेले. मुंबई दहशतवादी हल्यात पाकिस्तानचा हात असल्याचे अनेक पुरावे भारतीय सुरक्षा यंत्रणेला सापडले. २००६-०७ मध्ये बस्तर येथे आयोजित नक्सल काँग्रेस मध्ये काश्मीरी उग्रवादी संघटना हिज्बुल मुजाहिदिनचे प्रतिनिधी सहभागी असल्याच्या बातमीचे समर्थन पोलिसांकडून करण्यात आले. कांही वर्षापूर्वी नक्सलवाद्यांच्या केंद्रीय कमेटीचे प्रवक्ता अभय यांनी उग्रवाद्यांना नक्सलवाद्यासोबत मिळून लडण्याचे आव्हान केले होते. तसेच नारायणपूर अबूझमाड क्षेत्रात जो नक्सलवादी गट सक्रिय असतो. त्यातील कांही लोकांना नमाज अदा करताना पाहण्यात आले. श्रीलंकेतील लिट्टेमध्ये उग्रवाद्याकडून कांही नक्सलवाद्याना प्रशिक्षण देण्यात आल्याच्या बातम्या ऐकण्यात आल्या. नक्सलवाद्यांसोबतच्या सामन्यात तपासणी नंतर चीनी शस्त्र सापडल्याचे कांही वाचकांना आठवत असेल.

अलिकडील काळात अलकायद्याचे चीफ अयमान अल जवाहिरीने एक रेकॉर्डीग टेपमार्फत लवकरच अलकायदा या संघटनेची भारतीय शाखा सुरु करण्यात येणार असल्याचे सांगितले होते. या संघटनेमार्फत भारतात इस्लामिक राज्यांचा प्रसार करण्यात येईल. तसेच पाकिस्तानच्या अमीर उमर नामक व्यक्तिस त्या शाखेचा प्रमुख बनवल्याचे ही वाचण्यात आले.

वरील सर्व नुसत्या बातम्या नाहीत. त्यात गंभीर अर्थ दडलेला आहे. या सर्व देशांतर्गतच्या आंतरिक सुरक्षा व्यवस्थेप्रति गंभीर धोक्याच्या दिशेने संकेत करत आहेत. नक्सलवाद आणि इस्लामिक कट्टरपंथी दहशतवादी संघटना हिजबुल मुजाहिदीन, ईस्लामिक स्टेट, जैश ए मोहम्मद, लष्कर ए तोयबा यासारख्या संघटनांच्या आपापसातील समन्वयामुळे देशाच्या सुरक्षेस धोका निर्माण झाला. नक्सलवाद आणि दहशतवादाची कार्यप्रणाली, विषय आणि प्राथमिकता यात भलेही अंतर असेल परंतु त्यांचे ध्येय एकच आहे. भारताचा विनाश व तुकडे करने.

भारतातील सर्व जनतेला समजून घ्यावे लागेल की, देशाच्या अंतर्गत सुरक्षेसाठी उपलब्ध अडथळे किंवा धोके फक्त देशातील कांही असंतुष्ट संघटना किंवा व्यक्तिंचे नाहीत. ते फार तर धरणे, आंदोलन, उपोषण, तोडफोड



Scanned by CamScanner

किंवा जाळपोळ करतील. परंतु देशाच्या अंतर्गत सुरक्षेच्या नवीन समस्यांमाग पाकिस्तान, चीन या सारखे शेजारी आणि शस्त्रास्त्राचे उत्पादक अमेरिका, जर्मनी, फ्रान्स सारखे राष्ट्र आहेत.

कोणत्याही देशाचे तीन मुलभुत घटक असतात. प्रथम जनता म्हणजेच देशात राहणारे विभिन्न धर्म, जात, भाषा, बोली, वंश, प्रादेशिकता व विभिन्न संस्कृतिशी संबंधीत करोडो लोक जे या देशाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक विकासाशी संबंधित व्यवस्थेचे अभिन्न भाग आहेत. दुसरे भौतिक संपदा उदा.नैसर्गिक साधनसंपत्ती, उर्जा, संरक्षण, संशोधन केंद्र, उद्योग, संसद, विधानसभा, मंत्रालय, व्ही.आय.पी., लोक त्यांचे निवासस्थान, मॉल, स्टेडिअम, अधिक लोकसंख्या असणारे सार्वजनिक ठिकाण, धार्मिक व्यवस्थेचे केंद्र यासह इतर अनेक संपदा. तिसरा - माहिती देशाशी निगडीत सर्व गुप्त माहिती, देशातील महत्वाचे धोरणात्मक निर्णय, देशाच्या आर्थिक, संरक्षण आणि राजकीय व्यवस्थेशी निगडीत महत्वपूर्ण गोष्टी, तत्वे ज्याचा इतर देशाला कुटनीतीक फायदा होत असतो.

आंतरराष्ट्रीय समुदायाचा दबाब किंवा इतर अन्य कारणामुळे जर एखादा देश समोरा समोर युध्द करु शकत नसेल तर आपल्या शत्रु राष्ट्राच्या वरील तीन संपदांना नष्ट करुन त्यास कमकुवत बनवण्याचा प्रयत्न करतो. राष्ट्रांतर्गत जनतेचा देशाची व्यवस्था, राज्यघटना, लोकशाही, राष्ट्रीयत्व आणि संघात्मक प्रतिचा विश्वास डळमळीत होईल अशी परिस्थिती निर्माण केली जाते. जनता धर्म, जात, संप्रदाय, विकास-अविकास, नविन राज्य, शोषण, प्रादेशिक असमतोल, स्वायतत्ता, भाषावाद इ. विषयामुळे आंदोलन करते. सगळीकडे अशांतता आणि अविश्वासाची स्थिती निर्माण केली जाते. साधारण वाटणारे उपोषण कधी हिंसक बनेल याचा थांगपत्ता लागत नाही. अशा परिस्थितीस विघटनकारी म्हणतात.

देशाच्या महत्वपूर्ण संपदा, आधारभूत संरचना,उर्जा, संचार, संरक्षण, संशोधन, धार्मिक केंद्र, लोकशाहीचे केंद्रावर मानवी बॉम्ब, आई.ई.डी. ब्लास्ट किंवा दहशतवादी हमले करुन त्यांना अधिक नुकसान पोंहचवले जाते. बऱ्याचवेळा नष्टही केले जाते. त्यास विध्वंसात्क गतिविधी म्हणतात. जेंव्हा देशाशी संबंधित महत्वपूर्ण माहिती, गूढ रहस्य, गोपनीय धोरणात्मक निर्णय इ.स जाणून घेण्याचा प्रयत्न केला जातो. त्यासाठी शत्रु देशाची गुप्तचर यंत्रणा एक गुप्त हेर यंत्रणा तयार करते. देशाचे शास्त्रज्ञ नोकरवर्ग, सैन्यातील अधिकारी, राजदूत, तसेच अंतर्गत माहिती मिळवण्यापर्यंत पोहचणाऱ्या महत्वपूर्ण लोकांना गुप्तहेराच्या जाळयात अडकवले जाते. देशांतर्गत कोणत्याही मुद्यावर राष्ट्रव्यापी आंदोलन छेडले जाते. देशात संसद, मुंबई, जयपूर, हैद्राबाद सहित अनेक ठिकाण दहशतवादी हल्ले आणि बॉम्ब स्फोटाचे शिकार बनले. देशातील अनेक महत्वाचे अधिकरी, नौकरवर्ग, सैनिक अधिकारी यांच्यावर गुप्तहेराचे आरोप ठेवण्यात आले. पुकार चित्रपटात हे व्यवस्थितपणे दाखवले. तर बेबी



Scanned by CamScanner

ISBN -978-81-922212-8-1


चित्रपटात अक्षय कुमारने ही भुमिका वठवली. सर्वसाधारणपणे हे स्पष्ट आहे की, भारताचे शत्रु भारतातील वरील तीन संपदाचे प्रखर दुश्मन आहेत. भारतास पुर्णतुः नष्ट करण्याची त्याची मानसिकता, निती व कार्यक्रम आहेत. जे पूर्णतः भारताच्या भूमीवर कार्यान्वित होत आहेत न कि सीमा भागावर.

आज वर्तमान भारताच्या भौगोलिक सीमांची स्थिती, शेजारील देशासहित जगातील अन्य देशासोबत भारताचे जे संबंध आहेत. त्याचा विचार करता भारताच्या भौगोलिक सीमांचे संरक्षण आणि अंतर्गत सुरक्षा हे दोन वेगवेगळे विषय नाहीत. तर ते एकच विषय आहेत. ज्यास आपण राष्ट्रीय संरक्षणाचे प्रयत्न असे म्हणतो. भारताच्या अंतर्गत सुरक्षेसमोरील उपलब्ध आव्हान आणि संभाव्य नवीन आव्हांनावर विचार करण्यासाठी संपूर्ण दक्षिण आशियावर नजर टाकावी लागेल. दक्षिण आशियात भारत, पाकिस्तान, अफगाणिस्तान, नेपाळ, भुतान, बांग्लादेश आणि मालद्वीप बेटे यांचा समोवश होतो. जेथे संपूर्ण जगातील १/६ लोकसंख्या निवास करते. दक्षिण आशिया विकसनशील आणि गरीब देशांचा भू-प्रदेश आहे. जेथे जाति, धर्म आणि भाषिक गुंतागुंतीने सीमांना प्रभावित केले.

भारताच्या भौगोलिक सीमा जात-धर्म यांच्या गुंतागुंतीत विघटन दहशतवाद आणि विद्रोहाने प्रभावित झाल्या. या सर्व देशांच्या सीमा भौगोलिक किंवा नैसर्गिक नाहीत. दोन देश मूळ प्रजातिच्या आधारावर वेगळे करता येत नाहीत. भाषा, संस्कृती भागीदार आहे. ज्याचा फायदा देशाचे शत्रु राष्ट्र घेतात. तसेच ज्या सीमा आहेत त्या राजकीय आधारावर बनवल्या आहेत. भारत त्यात केंद्रीय भूमिका बजावतो. कारण पाकिस्तान, बांग्लादेशांची निर्मिती त्यातुनच झाली. तर नेपाळ, भूतान आणि श्रीलंकेचे भारतासोबत घनिष्ठ संबंध आहेत. या सर्व देशांचा सामाजिक जिव्हाळा, संस्कृति, भाषा, बोली, खान-पान, नातेसंबंध, धर्म यासारख्या बाबी सीमांच्या मर्यादा बाहेरच्या आहेत.

दक्षिण आशिया फक्त लोकसंख्येचा विस्फोटाचा सामना करत नाही. तर अज्ञान, आरोग्याच्या सुविधांचा अभाव, शुध्द पिण्याचे पाणी, घर, भोजन इ. मुलभुत समस्यांने ग्रासला आहे. याशिवाय हे देश भ्रष्टाचाराचे अड्डे बनलेत. गैर मार्गाने मिळवलेला पैसा (ब्लॅक मनी) हवाल व्यापार अधिक वाढला आहे. याच दक्षिण आशियात अफीम, चरस, गांजा, हेरोइन, हशीश या सारख्या नशील्या पदार्थाचे उत्पादन अधिक प्रमाणात होते. नशील्या पदार्थाची तस्करी आणि दहशतवादी घटनांच्या संयुक्त समीकरणामुळे या सर्व भागात हिंसा आणि संघर्षाचे वातावरण निर्माण झाले. त्यामुळे नार्को दहशतवादाचा उदय झाला. त्यापासून भारताची ही भूमी वाचू शकली नाही.

जम्मू आणि काश्मीर कश्मीरी दहशतवाद आणि पाकिस्तानाच्या भितीने त्रस्त आहेत. गुजरात, राजस्थान, पंजाब आणि जम्मू व काश्मीर पर्यंत पाकिस्तानची सीमा लागून आहे. जेथून नशीले पदार्थ शस्त्रास्त्र विस्फोटक



Scanned by CamScanner

पदार्थांच्या स्मॅगलिंग सोबतच सीमावर्ती भागात राष्ट्र विघटनाचे प्रयत्न होत असतात. नॉर्थ-ईस्टकडे अलगाववादी शक्ति, उग्रवाद आणि प्रादेशिक स्वायत्तोच्या मागणीचे समर्थन करतात. बांग्लादेशाला लागून असलेल्या सीमावर्ती भागात घुसखारी किंवा शरणार्थिचे येणे बंद झाले नाही. देशातील विभिन्न भागात हे लोक फैलतात. नॉर्थ ईस्टमध्ये या लोकांनी जमीनीवर ताबा मिळविला. उत्तर पूर्वेकडे चीनी ड्रॅगनने आपले वर्चस्व निर्माण केले. अरुणाचलन प्रदेश, अक्साई चिनवर आपले वर्चस्व सांगतात. आमच्या सीमा भागात घुसतात. श्रीलंका आणि भारतात तमिळ इलमचा विषय आहे. ज्यात देशातील एका महत्वाच्या राजकीय व्यक्तिचा मृत्यू झाला. देशात माओवादी पशुपति पासून तिरुपती पर्यंत एक कॉरिडोर बनवु इच्छीतात. देशातील अनेक राज्यात नक्सलवाद आहे. त्याच्या व्याप्तीत वाढ होत आहे. देश विरोधी इतर शक्ति आपापसात समन्वय साधून आहेत. भारताची अंतर्गत सुरक्षेसाठी विघटन हा सर्वात मोठा धोका आहे. देशात जनतेच्या विघटनाचे विविधता हे सर्वात महत्वाचे कारण आहे. जे देशाच्य अंतर्गात सुरक्षिततेला धोक्याचा इशारा देत आहे.

भारतात हजारो भाषा, बोली, समुदाय, प्रजाति, जाती, धार्मिक, विश्वास, रुढी परंपरा आणि संस्कृतीचे लोक राहतात. यांच्यातील परस्पर संघर्षाचे कारण या विविधतेत आहे. इंग्रजांनी या विविधतेच्या फायदा आमचे विभाजन करण्यासाठी घेतला. कोणत्या ना कोणत्या मार्गाने भारतावर दबाव किंवा प्रभुत्व निर्माण करण्याची इच्छा बाळगणारे पाकिस्तान, चीन सहित अन्य राष्ट्र त्याचा फायदा घेत आहेत.

आर्थिक उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण प्रक्रिया प्रारंभ झाल्यामुळे व्यवसाय आणि राजकारणातील पैसाच्या प्रभाव तीव्र गतीने वाढला आहे. ज्यामुळे देशांतर्गत करोडपतिचा एक नवा गट उदयास आला. नैसर्गिक साधनसंपत्तीचे अंधाधुंदीपणे होणारा वापर औद्योगिकरण, गहाण वस्त्यांचा विस्तार, विस्थापन, स्थानिक समुदायांच्या भावनांचे दफन, सत्ता राजकारण, खरेदी-विक्रीचे राजकारण, प्रशासकीय व्यवस्थेवर प्रभाव टाकण्याचे प्रयत्न, प्रसार-माध्यमाचा अवाजवी प्रभाव वाढत आहे. वर वर पहाता राष्ट्रीय एकात्मता मजबुत वाटते. पण अंतर्गत ती निकामी व खोकली बनली आहे. संघात्मक भावनेचे अवमूल्यन होत आहे. त्याचा केंद्र-राज्य संबंधावर प्रभाव पडला देशात शासन यंत्रणा कमकुवत बनली. लोकशाही स्वातंत्र्य, बहुपक्षीय व्यवस्था, मतदान आणि निवडणूकीच्या राजकारणात देशात चळवळ आणि अशांततेचे प्रमाण वाढले. देशातील विभिन्न समुहात परस्पर अविश्वास आणि असुरक्षिततेच्या भावनेने जन्म घेतला. अनेक जाती, समुदाय, धर्मांच्या भावनासोबत नकारात्मकपणं राजकारण करणे सोपे बनले. तर असमान विकास आणि जनतेच्या अपेक्षा पूर्ण होत नसल्यामुळे जनता स्वतःस वंचित समजत आहे. लोकातील सामाजिक आणि आर्थिक असुरक्षितता देशाच्या विभाजनाचे प्रमुख कारण आहे. पाकिस्तान आणि चीन सारख्या शक्ति कायदा-सुव्यवस्था देशाचे संविधान तसेच या देशाच्या व्यवस्थेत विश्वास नसणाऱ्या लोकांना आपल्या जाळयात ओढतात.



Scanned by CamScanner

भारतात अंतर्गत अशांतता निर्माण करण्यात चीनची भूमिका महत्वाची आहे. चीन ने नागा, मिजो आणि मीति यांना आर्थिक मदत, शस्त्रास्त्र व सुरक्षित अभयारण्य उपलब्ध करुन दिले. पाकिस्तान सोबत प्रादेशिक जवळीकता, तंत्रज्ञान व अणु तंत्रज्ञान दिले. पाकिस्तान, म्यानमार आणि बांग्लादेशासोबत सहकार्य निर्माणाचे प्रयत्न केले. ज्यातून भारतावरील दबाव वाढवला. राज्यपुरस्कृत दहशतवाद आणि भारत विरोधी धोरण पाकिस्तानच्या परराष्ट्र धोरणाचा मुख्य भाग आहे. त्यामुळे आई.एस.आई. भारताच्या अंतर्गत सुरक्षेला नष्ट करु इच्छिते.

अशा प्रकारे दहशतावाद, नक्सलवाद, उत्तर-पूर्वेकडील उग्रवाद, भ्रष्टाचार, राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेचा ऱ्हास इ. कारणामुळे देशात अंतर्गत सुरक्षेसमोर अनेक संकट निर्माण झाले. या संकटाविषयी लोकांत जागरुकता तिव्र गतीने वाढत नाही ही चिंता करण्यासारखी बाब आहे.

माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीने बहिर्गत व आंतरिक सुरक्षेसाठी अधिक भयानक आव्हान निर्माण केले. इंटरनेटच्या माध्यमातून उत्तेजक साधना सोबतच बॉम्ब बनवण्याच्या पध्दतीपर्यंत सर्वच गोष्टी सहज उपलब्ध होत आहेत. आज कोणत्याही विघटनकारी घटकांना भौतिक रित्याएखाद्या विशिष्ट भागात पोहचविण्याची गरज नाही. इंटरनेट, व्हिडीओ कॉन्फ्रसिंगच्या माध्यमातून जगातील कोणत्याही कोपऱ्यातुन संपूर्ण जगाशी संवाद साधता येतो. पाक पुरस्कृत दहशतवादी संघटना आणि आई.एस.आई. मार्फत त्याचा पुरेपुर वापर केला जातो. सोशल मिडियावर संघटना समुहामार्फत एकमेकाविरुध्द विष पेरण्याचे कार्य केले जाते. भडकावणारे लिखान व मतमतांतरे व्यक्त केली जातात. काल्पनिक आणि भडकावणाऱ्या घटना व बातम्यांना तीव्र गतीने पसरवून वातावरण दुषित केले जाते. मागील काळात फेसबुक आणि वॉट्सअपमुळे बऱ्याच ठिकाणी कायदा सुव्यवस्था धोक्यात आली. या क्षेत्रातील क्रांतीने ग्लॅमर जगताला अधिक लोकप्रीय बनवले. आज सर्वसामान्य नागरिकापासून ते विशेष व्यक्ति पर्यंत सर्वांचाच वेळ टी.व्ही., इंटरनेट, मोबाईल यावर खर्च होतो. ज्यामुळे लोकांचे राष्ट्रीय व आंतरिक सुरक्षेच्या विषयाकडे दुर्लक्ष होते. देशाचे आंतरिक आणि बाह्य सुरक्षेची जबाबदारी फक्त पोलिस सैनिक किंवा सशस्त्र सैनिकांची नाही. तर प्रत्येक देशवासीयाची आहे.

केंद्र आणि राज्यशासनानी आंतरिक सुरक्षेच्या वर्तमान धोक्यापासून वाचवण्यासाठी अनेक प्रयत्न केले. ज्यात ज्वाइंट ऑपरेशन्स, इंटलेजेंस शेयरिंग या सोबत पोलिस आणि सुरक्षा सैनिकांच्या सशक्तीकरणासाठी प्रशिक्षण व योग्य साधनांच्या उपलब्धीसाठी प्रयत्न केले. या सर्व उपायांना यशस्वी करण्यासाठी देशातील जनता जागरूक असणे कमप्राप्त आहे.

जनतेला आजू-बाजूला घडणाऱ्या घटनावर लक्ष ठेवावे लागेल कोणती घटना कोणत्या राष्ट्रीय संकटाचे कारण बनेल हे निश्चित सांगता येत नाही. आपल्या शेजारील संदिग्ध, शंकास्पद आणि असामाजिक तत्वांना



Scanned by CamScanner

कायद्याच्या कचाट्यात आणण्यास मदत करावी लागेल. राष्ट्रीय सुरक्षा देशाचे ऐक्य आणि एकात्मेला धोक्यात आणण्यास प्रभावित करणाऱ्या कोणत्याही घटनेची माहिती लवकर शासनास द्यावी. सुरक्षा संस्था व संघटनांना सहकार्य करावे. चुकीच्या बातम्या पसरवणाऱ्याचा पर्दाफाश करावा लागेल. भडक भाषण करणाऱ्यास ओळखावे. धार्मिक, जातीय व सांप्रदायीक सहिष्णूता टिकून ठेवावी. खोटी किंवा राष्ट्रद्रोही पत्रकारिता करणाऱ्या प्रसारमाध्यमांच्या विरुध्द कठोर भुमिका घ्यावी भ्रष्ट व्यक्तीस बहिष्कृत करावे. त्यांना तुरुंगात टाकण्यासाठी मदत करावी.

समाजात फुट पाडणाऱ्या स्वार्थी तत्वांना ओळखावे. त्यांना वाईट कृत्य करण्यापासून रोकावे तेंव्हा कुठे देश विकासाच्या मार्गाने मार्गस्त्र होईल. देश सुरक्षित बनेल.

संदर्भ ग्रंथ :-

१) भारत आणि भारताचे शेजारी - संपादक : मनिषा टिकेकर, साधना प्रकाशन पुणे.

२) भारत आणि दक्षिण आशियाई राष्ट्रांमधील संबध - डॉ.बी.डी.तोडकर - डायमंड पब्लिकेशन्स पुणे.

३) The Challenges of Internal Seacurity of India - Editior V.D.Gaikwad - Publisher-Omsai Bahuudeshiya Sewabhavi Sansahtha, Naigaion.

४) Impact of Globalization on Indian State - Chief Editor- Sugri V.B.Phad- Publisher - Omsai Bahuudeshiya Sevabhavi Sanstha, Naigaon.



Scanned by CamScanner